


# RRB NTPC GRADUATE 2024 CBT 2

Graduate Level | CEN 05/2024

**MARATHI ANSWER KEY**

## Official Answer Key with Solutions

All 1 Shifts · 13-10-2025 to 13-10-2025

| | |
|---|---|
| **Questions** | 120 |
| **Marking** | +1 correct / -1/3 wrong |
| **Duration** | 90 minutes |
| **Sections** | General Awareness 50 · Maths 35 · Reasoning 35 |

Every paper here is the official RRB response sheet with the correct answer marked.

---

### HOW TO USE THIS BOOK

1. Open the INDEX on the next page.
2. Click any row to jump straight to that date and shift.
3. Correct options are ticked in green, wrong ones crossed in red.
4. Use the bookmarks panel of your PDF reader to move between shifts.

Check your marks, normalized score and zone-wise rank free at
**rank.qmaths.in**

**Blackbook**

Score & Rank Calculator · rank.qmaths.in

Compiled 11 September 2026

# INDEX · Click any row to open that paper

RRB NTPC Graduate 2024 CBT 2 (Marathi) · 1 shifts


| DAY | DATE | SHIFT | TIME | PAGE |
|---|---|---|---|---|
| Day 1 | **13-10-2025** | Shift 2 | 14:30 - 16:00 | 3 |


Generated by rank.qmaths.in

# रेलवे भर्ती बोर्ड / RAILWAY RECRUITMENT BOARDS
## ०५/२०२४ - एनटीपीसी स्नातक स्तर - CEN - 05/2024 - NTPC Graduate Level

| | |
|---|---|
| Test Center Name | iON Digital Zone iDZ Shiye |
| Test Date | 13/10/2025 |
| Test Time | 2:30 PM - 4:00 PM |
| Subject | RRB NTPC Graduate Level II |

*** Note**
**Correct Answer will carry 1 mark per Question.**
**Incorrect Answer will carry 1/3 Negative mark per Question.**

**1. Options shown in green color with a tick icon are correct.**

**2. Chosen option on the right of the question indicates the option selected by the candidate.**

Section : **RRB NTPC Graduate Level II**

**Q.1** **खालीलपैकी कोणते भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या जहालमतवादी काळातील स्वदेशी, स्वावलंबन आणि ब्रिटिश राजवटीविरुद्ध थेट कारवाईवर भर देणारे प्रमुख नेते होते?**

**Ans**
✗ 1. दादाभाई नौरोजी, गोपाळ कृष्ण गोखले आणि म.गो.रानडे
✓ 2. बिपनचंद्र पाल, बाळ गंगाधर टिळक आणि अश्विनीकुमार दत्त
✗ 3. राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर आणि म.गो.रानडे
✗ 4. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशाह मेहता आणि आनंद चार्लू

**Q.2** **भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या मवाळ विचारसरणीकडे झुकणारे नेते रास बिहारी घोष यांनी काँग्रेसच्या कोणत्या दोन अधिवेशनांचे अध्यक्षपद भूषवले होते?**

**Ans**
✗ 1. कलकत्ता (1906) आणि सूरत (1907)
✗ 2. बॉम्बे (1885) आणि मद्रास (1887)
✓ 3. सूरत (1907) आणि मद्रास (1908)
✗ 4. लाहोर (1909) आणि कलकत्ता (1911)

**Q.3** **भारताच्या कोणत्या गव्हर्नर-जनरलने, भारतीय शासकांना ब्रिटिश सैन्य दरबारात बाळगण्यास आणि त्याच्या देखभालीवर खर्च करण्यास भाग पाडणारी, तैनाती फौजेची पद्धत सुरू केली?**

**Ans**
✓ 1. लॉर्ड वेलेस्ली
✗ 2. लॉर्ड हेस्टिंग्ज
✗ 3. लॉर्ड डलहौसी
✗ 4. लॉर्ड कॉर्नवॉलिस

**Q.4** **जर वय पिरॅमिडचा (Age Pyramid) पाया विस्तृत असेल आणि तो वेगाने वरच्या दिशेने निमुळता होत असेल, तर ते काय दर्शवते?**

**Ans**
✓ 1. प्रगामी लोकसंख्या (Progressive population)
✗ 2. स्थायी लोकसंख्या (Stationary population)
✗ 3. प्रतिगामी लोकसंख्या (Regressive population)
✗ 4. अस्थायी लोकसंख्या (Non-Stationary population)

Generated by rank.qmaths.in

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now

Q.5 कंटेनर A मध्ये प्रति लिटर ₹40 किमतीचे 30 लिटर शुद्ध दूध आहे आणि कंटेनर B मध्ये प्रति लिटर ₹50 किमतीचे 50 लिटर शुद्ध दूध आहे. दोन्ही कंटेनरमधील दूध एकत्रित केले जाते. तर मिश्रणाची प्रति लिटर सरासरी किंमत ही कंटेनर A च्या प्रति लिटर दुधाच्या सरासरी किमतीपेक्षा कितीने जास्त किंवा कमी असेल?

Ans
1. ₹6.25 ने कमी
2. ₹6.25 ने जास्त ✔
3. ₹6.50 ने कमी
4. ₹6.50 ने जास्त

Q.6 एक अप्रामाणिक दुकानदार आपला माल खरेदी किंमतीला विकण्याचे आश्वासन देतो, परंतु तो असे वजन वापरतो जे प्रत्यक्षात त्यावर लिहिलेल्या वजनापेक्षा 37% कमी असते. तर त्याच्या नफ्याची टक्केवारी शोधा.

Ans
1. $63\frac{46}{63}\%$
2. $60\frac{46}{63}\%$
3. $64\frac{46}{63}\%$
4. $58\frac{46}{63}\%$ ✔

Q.7 खालीलपैकी कोणत्या तारखेला राज्यसभेचे पहिले अधिवेशन झाले होते?

Ans
1. 3 एप्रिल 1950
2. 26 नोव्हेंबर 1952
3. 26 नोव्हेंबर 1951
4. 13 मे 1952 ✔

Q.8 5 ऑगस्ट 2025 रोजी लँडलॉक्ड डेव्हलपिंग कंट्रीज (LLDC3) वरील संयुक्त राष्ट्रांची तिसरी परिषद कोणत्या देशात सुरू झाली?

Ans
1. किर्गिझस्तान
2. उझबेकिस्तान
3. तुर्कमेनिस्तान ✔
4. कझाकस्तान

Q.9 अर्धवार्षिक आकारणीनुसार ₹10,000 च्या मुद्दलावर 1 वर्षानंतर 6% वार्षिक चक्रवाढ दराने देय असलेली रक्कम (₹ मध्ये) _______ आहे.

Ans
1. 10,906
2. 10,600
3. 10,605
4. 10,609 ✔

Q.10 दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

4 4 12 60 420 ?

Ans
1. 3740
2. 3720
3. 3780 ✔
4. 3760

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.11 जगात सर्वात जास्त वापरली जाणारी हवामान वर्गीकरण प्रणाली कोणती आहे?

Ans
1. थॉर्नथवेट वर्गीकरण
2. ट्रेवर्था वर्गीकरण.
3. कोपेन वर्गीकरण
4. स्ट्रॅहलर वर्गीकरण

Q.12 X आणि Y या वस्तूंच्या खरेदी किमतींचे गुणोत्तर 2 : 3 आहे. एका माणसाला X वस्तू विकून 43% नफा होतो आणि Y वस्तू विकून 12% तोटा होतो. संपूर्ण व्यवहारात त्याचा नफा/तोटा किती टक्के असेल?

Ans
1. 10% तोटा
2. 10% नफा
3. 11.5% तोटा
4. 9.5% नफा

Q.13 एका दुकानात एका वस्तूवर अनुक्रमे 10%, 15% आणि 20% अशा सलग तीन सवलती दिल्या जातात. अंतिम किंमत समान असण्यासाठी सवलतीची एकच समतुल्य टक्केवारी शोधा.

Ans
1. 42.8%
2. 40.8%
3. 45%
4. 38.8%

Q.14 ऑगस्ट 2025 मध्ये, केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी हैदराबादमध्ये भारतातील अशा प्रकारची पहिली सुविधा असणाऱ्या कोणत्या सुविधेचे उद्घाटन केले?

Ans
1. भारतातील पहिले अत्याधुनिक ॲनिमल स्टेम सेल बायोबँक आणि प्रयोगशाळा
2. भारतातील पहिली ॲनिमल क्लोनिंग आणि बायोटेक्नोलॉजी प्रयोगशाळा
3. भारतातील पहिले ॲनिमल जीनोम सिक्वेंसिंग सेंटर
4. भारतातील पहिली पशुवैद्यकीय लस संशोधन संस्था

Q.15 MS वर्डमध्ये Ctrl + J वापरल्याने काय परिणाम होतो आणि ते Ctrl + Shift + J पेक्षा वेगळे कसे आहे?

Ans
1. Ctrl + J टेक्स्टला जस्टीफाय करते; Ctrl + Shift + J शेवटची ओळ देखील ताणलेली असेल या स्थितीत डिस्ट्रीब्युटेड जस्टिफिकेशन लागू करते.
2. Ctrl + J डावीकडे संरेखित करते; Ctrl + Shift + J उजवीकडे संरेखित करते
3. Ctrl + J टेक्स्टला मध्यभागी आणते; Ctrl + Shift + J जस्टिफिकेशन बदलते
4. दोन्ही शॉर्टकट टेक्स्टला सारखेच जस्टीफाय करतात.

Q.16 6, 8, 10 आणि 12 यांची सरासरी किती आहे?

Ans
1. 10
2. 7
3. 9
4. 8

Q.17 खाली दिलेल्या दोन्ही त्रिकांच्या प्रारूपाप्रमाणे प्रारूप असलेले असलेले त्रिक पर्यायातून निवडा. दोन्ही त्रिक एकाच प्रारूपाचे अनुसरण करतात.

KH-MI-NP
MJ-OK-PR

Ans
1. PL-QM-RV
2. OL-QM-RT
3. OL-QM-RV
4. PL-QN-RV

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.18 9 हे एका विशिष्ट तर्कानुसार 55 शी संबंधित आहे. त्याच तर्कानुसार 12 हे 73 शी संबंधित आहे. तर त्याच तर्कानुसार 16 हे दिलेल्या पर्यायांपैकी कोणत्या पर्यायाशी संबंधित असेल?

(सूचना: संख्यांना त्यांच्या घटक अंकांमध्ये विभाजित न करता संपूर्ण संख्यांवर गणितीय क्रिया कराव्यात. उदा. 13 - 13 वर बेरीज/वजाबाकी/गुणाकार अशा गणितीय क्रिया करता येतील. 13 ला 1 आणि 3 मध्ये विभाजित करून नंतर 1 आणि 3 वर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

Ans
- ✔ 1. 97
- ✘ 2. 96
- ✘ 3. 99
- ✘ 4. 98

Q.19 या प्रश्नात एका विधानानंतर I आणि II क्रमांकाच्या दोन कार्यवाही दिल्या आहेत. विधानातील प्रत्येक गोष्ट सत्य असल्याचे गृहीत धरा आणि विधानात दिलेल्या माहितीच्या आधारे, कोणती/त्या कार्यवाही विधानाशी तर्कसंगत आहे/आहेत, ते ठरवा.

**विधान:**
ग्रामीण शाळांमधील अनेक विद्यार्थी प्रशिक्षित शिक्षकांच्या अभावामुळे आणि पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे मूलभूत वाचन आणि लेखन चाचण्या उत्तीर्ण होऊ शकत नाहीत.

**कार्यवाही:**
I. ग्रामीण भागात शिक्षकांची तात्काळ भरती करावी आणि त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.
II. गुणवत्ता राखण्यासाठी परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शाळांमधून काढून टाकले पाहिजे.

Ans
- ✘ 1. I आणि II दोन्ही तर्कसंगत आहेत
- ✘ 2. केवळ II तर्कसंगत आहे
- ✔ 3. केवळ I तर्कसंगत आहे
- ✘ 4. I किंवा II दोन्ही तर्कसंगत नाहीत

Q.20 कोणता HTTP स्टेटस कोड सूचित करतो की विनंती केलेले वेब पेज कायमचे नवीन स्थानी हलवले गेले आहे?

Ans
- ✘ 1. 404
- ✔ 2. 301
- ✘ 3. 302
- ✘ 4. 500

Q.21 भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदात 'मूळच्या भारतीय असलेल्या, पण भारताबाहेर राहणाऱ्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे हक्क' याबाबत तरतुदी आहेत?

Ans
- ✘ 1. अनुच्छेद 11
- ✔ 2. अनुच्छेद 8
- ✘ 3. अनुच्छेद 5
- ✘ 4. अनुच्छेद 13

Q.22 भारतातील दारिद्र्य निर्मूलनाच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या SGSY धोरणाचे पूर्ण स्वरूप काय आहे?

Ans
- ✔ 1. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना
- ✘ 2. स्वाभिमान ग्राम सुरक्षा योजना
- ✘ 3. स्वच्छ ग्राम स्वरोजगार योजना
- ✘ 4. स्वर्ण जयंती ग्राम समृद्धी योजना

Q.23 जर वार्षिक आकारणीनुसार चक्रवाढ व्याजदराने ₹10,000 ही रक्कम 2 वर्षांत ₹12,100 होते, तर चक्रवाढ व्याजाचा वार्षिक टक्केवारी दर किती असेल?

Ans
- ✘ 1. 8
- ✔ 2. 10
- ✘ 3. 12
- ✘ 4. 9

Blackbook

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.24 बोहर-बरी नियमांनुसार खालीलपैकी कोणते इलेक्ट्रॉन संरूपण संभाव्य नाही?

Ans ✗ 1. 2, 8, 5

✗ 2. 2, 8, 3

✗ 3. 2, 8, 8, 1

✓ 4. 2, 9, 7

Q.25 2013 मध्ये सुरू करण्यात आलेला, जगभरात कनेक्टिव्हिटी वाढवणे हा उद्देश असलेला चीनचा जागतिक पायाभूत सुविधा उपक्रम कोणता आहे?

Ans ✗ 1. इकॉनॉमिक कॉरिडॉर

✓ 2. बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह

✗ 3. इकॉनॉमिक बेल्ट इनिशिएटिव्ह

✗ 4. ग्रेट वॉल इनिशिएटिव्ह

Q.26 खालीलपैकी कोणत्या राज्याने, वैज्ञानिक विश्लेषण आणि एअरशेड-आधारित दृष्टिकोनावर आधारित भारताची पहिली राज्य-स्तरीय स्वच्छ हवा योजना सुरू केली आहे?

Ans ✗ 1. केरळ

✗ 2. महाराष्ट्र

✓ 3. उत्तर प्रदेश

✗ 4. कर्नाटक

Q.27 दिलेल्या मालिकेतील प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय यायला हवे?

9, 25, 57, 105, 169 , ?

Ans ✗ 1. 250

✗ 2. 247

✗ 3. 248

✓ 4. 249

Q.28 एक बोट प्रवाहाच्या दिशेने 25 km/hr आणि प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने 15 km/hr या वेगाने जाते.तर प्रवाहाचा वेग किती असेल?

Ans ✗ 1. 4 km/hr

✓ 2. 5 km/hr

✗ 3. 8 km/hr

✗ 4. 6 km/hr

Q.29 जुलै 2025 रोजी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या (IGNOU) पहिल्या महिला कुलगुरू म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली?

Ans ✗ 1. डॉ. नजमा अख्तर

✗ 2. प्रा.अनु सिंग लाठर

✓ 3. प्रा.उमा कांजीलाल

✗ 4. प्रा.शशिकला वंजारी

Q.30 खालीलपैकी कोणत्या संख्येला 93 ने नि:शेष भाग जाईल?

Ans ✓ 1. 855786

✗ 2. 856159

✗ 3. 856497

✗ 4. 858226

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

**Q.31** A, B, C, D, E, F, G आणि H ह्या व्यक्ती एका चौकोनी टेबलाभोवती टेबलाच्या केंद्राकडे तोंड करून बसलेल्या आहेत. त्यापैकी काही कोपऱ्यांवर बसल्या आहेत तर काही बाजूंच्या नेमक्या मध्यभागी बसल्या आहेत. E ही B च्या डावीकडे तिसऱ्या स्थानावर बसली आहे. E ही कोणत्याही बाजूच्या नेमक्या मध्यभागी बसली नाही. F ही B च्या उजवीकडे दुसऱ्या स्थानावर बसली आहे. G ही D आणि B यांची लगतची शेजारी आहे . H ही F च्या लगतच डावीकडे बसली आहे. C कोणत्याही कोपऱ्यांवर बसली नाही. D च्या डावीकडून मोजल्यास D आणि A यांच्या मध्ये किती व्यक्ती बसल्या आहेत?

**Ans**
- ✗ 1. चार
- ✓ 2. दोन
- ✗ 3. पाच
- ✗ 4. एक

**Q.32** भारत ________ कृषी हवामान (agroclimatic) प्रदेशांमध्ये विभागलेला आहे.

**Ans**
- ✓ 1. 15
- ✗ 2. 11
- ✗ 3. 12
- ✗ 4. 14

**Q.33** $24-3 \times 15-3 \times 17-3$ चे मूल्य काढा.

**Ans**
- ✓ 1. $\frac{1}{6120^3}$
- ✗ 2. $\frac{1}{6084^3}$
- ✗ 3. $\frac{1}{6144^3}$
- ✗ 4. $\frac{1}{6108^3}$

**Q.34** सरळरुप द्या.

$$\left(\frac{4}{2}\right)x^2 + 4x - \frac{2}{2} + \left(\frac{4}{2}\right)x^2 - 7x + \frac{6}{2}$$

**Ans**
- ✗ 1. $-4x^2 - (-3)x + (2)$
- ✗ 2. $4x^2 + (-3)x - (2)$
- ✗ 3. $-4x^2 - (-3)x - (2)$
- ✓ 4. $4x^2 + (-3)x + (2)$

**Q.35** 12, 15 आणि 20 ने भागल्यावर बाकी 5 उरेल अश्या सर्वात लहान धन संख्येला 4 ने भागल्यास बाकी किती राहील?

**Ans**
- ✓ 1. 1
- ✗ 2. 0
- ✗ 3. 3
- ✗ 4. 2

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.36 एका विशिष्ट सांकेतिक भाषेत,
A + B म्हणजे 'A ही B ची आई आहे'
A – B म्हणजे 'A हा B चा भाऊ आहे'
A x B म्हणजे 'A ही B ची पत्नी आहे'
A ÷ B म्हणजे 'A हा B चा पिता आहे'

खालीलपैकी कोणत्या पर्यायाचा अर्थ S ही P ची मुलगी आहे असा होतो?

Ans
✗ 1. P × Q + R – S ÷ T
✗ 2. P x Q ÷ R + S – T.
✗ 3. P – Q ÷ R × S + T.
✓ 4. P x Q ÷ R – S + T.

Q.37 भारतात प्रवेश करण्यापूर्वी शक (सिथियन) खालीलपैकी कोणत्या प्रदेशातून स्थलांतरित झाले?

Ans
✓ 1. मध्य आशिया
✗ 2. आग्नेय आशिया
✗ 3. पश्चिम युरोप
✗ 4. उत्तर आफ्रिका

Q.38 एका घन गोलार्धाचे एकूण पृष्ठफळ 155 $cm^2$ आहे. त्याची त्रिज्या (cm मध्ये) _____ आहे. ($\pi = \frac{22}{7}$ घ्या)

Ans
✗ 1. $\sqrt{\frac{1094}{66}}$
✗ 2. $\sqrt{\frac{1077}{132}}$
✗ 3. $\sqrt{\frac{1090}{66}}$
✓ 4. $\sqrt{\frac{1085}{66}}$

Q.39 तीन संख्यांचा माध्य 15 आहे. या प्रत्येक संख्येत 2 मिळवल्यास नवीन माध्य काय असेल?

Ans
✓ 1. 17
✗ 2. 15
✗ 3. 18
✗ 4. 16

Q.40 लक्ष बिंदू A पासून सुरुवात करतो आणि पूर्वेकडे 7 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवीकडे वळतो आणि 12 km गाडी चालवतो. तो शेवटचे डावे वळण घेतो आणि 6 km गाडी चालवतो आणि बिंदू B वर येऊन थांबतो. विनोद बिंदू A पासून पूर्वेकडे 16 km वर असलेल्या बिंदू P पासून सुरुवात करतो आणि पूर्वेकडे 4 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवे वळण घेतो आणि 12 km गाडी चालवतो. तो शेवटचे उजवे वळण घेतो आणि 3 km गाडी चालवतो आणि बिंदू Q वर येऊन थांबतो. तर बिंदू Q आणि बिंदू B मधील सर्वात कमी अंतर किती असेल? (सर्व वळणे केवळ 90 अंश वळणे आहेत.)

Ans
✓ 1. 4 km
✗ 2. 5 km
✗ 3. 3 km
✗ 4. 6 km

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now

Q.41 दिलेले/ली विधान (ने) आणि निष्कर्ष काळजीपूर्वक वाचा. विधानांमध्ये दिलेली माहिती सामान्यतः ज्ञात तथ्यांपेक्षा वेगळी असल्याचे आढळली, तरी ती सत्य आहे, असे गृहीत धरून, दिलेल्या निष्कर्षांपैकी कोणता/ते निष्कर्ष दिलेल्या विधानाशी/विधानांशी तर्कसंगत आहे/आहेत ते ठरवा.

**विधाने:**
सर्व उद्याने कुरण आहेत.
सर्व कुरणे जंगले आहेत.
काही जंगले बागा आहेत.

**निष्कर्ष:**
(I): काही उद्याने ही बागा आहेत.
(II): काही कुरणे ही बागा आहेत.

Ans
✗ 1. केवळ निष्कर्ष (II) तर्कसंगत आहे.
✗ 2. निष्कर्ष (I) आणि (II) हे दोन्ही तर्कसंगत आहेत.
✗ 3. केवळ निष्कर्ष (I) तर्कसंगत आहे.
✓ 4. निष्कर्ष (I) किंवा (II) यापैकी एकही निष्कर्ष तर्कसंगत नाही.

Q.42 ऑगस्ट 2025 मध्ये, खालीलपैकी कोणत्या संस्थेने वित्तीय क्षेत्रात जबाबदार AI वापरासाठी 7 मार्गदर्शक तत्त्वे सांगणारा फ्रेमवर्क फॉर रिस्पॉन्सिबल अँड एथिकल एनेबलमेंट ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजेंस (FREE-AI) कमिटी रिपोर्ट प्रसिद्ध केला?

Ans
✗ 1. सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI)
✗ 2. वित्त मंत्रालय
✗ 3. NITI आयोग
✓ 4. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI)

Q.43 5, 155 आणि 83 या संख्यांचा लसावि किती आहे?

Ans
✗ 1. 12685
✓ 2. 12865
✗ 3. 12245
✗ 4. 12425

Q.44 ऊर्जा मंत्रालयाच्या मते खालीलपैकी कोणता भारतातील ऊर्जेचा प्राथमिक स्रोत आहे? (मे 2023 पर्यंतच्या माहितीनुसार).

Ans
✗ 1. आण्विक
✗ 2. सौर
✓ 3. औष्णिक
✗ 4. जलविद्युत

Q.45 699138 या संख्येला खालीलपैकी कोणत्या संख्येने नि:शेष भाग जाईल?

Ans
✗ 1. 102
✗ 2. 108
✓ 3. 99
✗ 4. 117

Q.46 खालील त्रिकांमध्ये प्रत्येक अक्षर-समूह एका विशिष्ट तर्कानुसार पुढील अक्षर-समूहाशी संबंधित आहे. तर दिलेल्या पर्यायांमधून त्याच तर्काचे अनुसरण करणारा पर्याय निवडा.

CLAY - YLCA - LACY
BOWS - SOBW - OWBS

Ans
✗ 1. FILE - EIFL - LIFE
✗ 2. GEAR - GAER - RAEG
✗ 3. DENT - EDNT - TEND
✓ 4. FROM –MRFO –ROFM

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.47 जर x हा y च्या व्यस्त प्रमाणात आहे आणि x = 4 असताना y = 6 असेल, तर y = 32 असताना x चे मूल्य शोधा.

Ans
✗ 1. $\frac{15}{13}$
✗ 2. $\frac{19}{12}$
✓ 3. $\frac{3}{4}$
✗ 4. $\frac{8}{23}$

Q.48 एक दुकानदार पंख्याची किंमत त्याच्या खरेदी किमतीपेक्षा 50% जास्त सूचीबद्ध करतो आणि त्याच्या सूचीबद्ध किंमतीवर 10% सूट देतो. जर त्याला ₹56 चा नफा झाला असेल, तर पंख्याची सूचीबद्ध किंमत (₹ मध्ये) किती असेल?

Ans
✗ 1. 324
✗ 2. 260
✓ 3. 240
✗ 4. 493

Q.49 ऑगस्ट 2025 मध्ये, संशोधकांनी असे दाखवून दिले की अनुवांशिकरित्या विकसित केलेले एस्चेरिचिया कोलाय (E. कोलाय) जीवाणू इलेक्ट्रॉनिक्सशी संवाद साधून खालीलपैकी कोणत्या स्वरूपात कार्य करू शकतात?

Ans
✓ 1. सेल्फ-पॉवर्ड केमिकल सेन्सर्स
✗ 2. मायक्रोबियल फ्यूएल सेल्स फॉर इलेक्ट्रिसिटी जनरेशन
✗ 3. बायो-फ्यूएल्ड मेडिकल इंप्लांट्स
✗ 4. वायरलेस एनर्जी स्टोरेज युनिट्स

Q.50 भारतीय प्राणीशास्त्रीय सर्वेक्षणाच्या 'एनिमल डिस्कव्हरीज-न्यू स्पीशीज अँड न्यू रेकॉर्ड्स 2023' नुसार, कोणत्या प्रजातीला भारतातील सर्वात मोठ्या विद्यमान गोवंश म्हणून मान्यता देण्यात आली आहे?

Ans
✗ 1. नीलगाय
✗ 2. याक
✗ 3. रानटी म्हैस
✓ 4. गवा

Q.51 कुंभमेळ्याबद्दल खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे?

Ans
✓ 1. कुंभमेळा नर्मदेच्या काठावर उज्जैनमध्ये भरवला जातो.
✗ 2. कुंभमेळा गंगेच्या काठावर प्रयागराजमध्ये भरवला जातो.
✗ 3. कुंभमेळा गोदावरीच्या काठावर नाशिकमध्ये भरवला जातो.
✗ 4. कुंभमेळा गंगेच्या काठावर हरिद्वारमध्ये भरवला जातो.

Q.52 सायप्रसकडून दिला जाणारा, (त्याच्या) पहिल्या राष्ट्रपतींच्या नावाने असलेला कोणता सन्मान, 16 जून 2025 ह्या दिवशी, निकोसियाच्या भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळाला?

Ans
✗ 1. ग्रँड कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ मॅकॅरिओस III
✓ 2. ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मॅकॅरिओस III
✗ 3. ग्रँड कॉलर ऑफ द ऑर्डर ऑफ मॅकॅरिओस IV
✗ 4. ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मॅकरिओस IV

Q.53 न्यूट्रॉनबाबत कोणते विधान योग्य आहे?

Ans
✗ 1. त्यांच्याकडे धनप्रभार असतो
✗ 2. ते प्रोटॉनपेक्षा जड असतात.
✓ 3. ते तटस्थ असतात
✗ 4. त्यांच्याकडे ऋणप्रभार असतो

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.54 खालीलपैकी कोणता पर्याय ASCII हा युनिकोडशी बॅकवर्ड कंपॅटिबिलिटी कशी सुनिश्चित करतो याचे अचूक वर्णन करतो?

Ans
1. U+007F च्या पलीकडे सर्व युनिकोड चिन्हे समाविष्ट करण्यासाठी ASCII मध्ये सुधारणा करण्यात आली.
2. ASCII युनिकोडच्या पूर्ण रेंजप्रमाणेच 8-बिट एन्कोडिंग वापरते.
3. युनिकोडचे पहिले 128 कोड पॉइंट्स ASCII मूल्यांशी अगदी जुळतात. ✔
4. युनिकोडने ASCII कंट्रोल कॅरेक्टर पूर्णपणे अमान्य केले

Q.55 आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून ओळखला जाणारा 'जागतिक व्याघ्र दिन' हा दरवर्षी कोणत्या दिवशी साजरा केला जातो?

Ans
1. 29 जुलै ✔
2. 15 जुलै
3. 30 जुलै
4. 25 जुलै

Q.56 हृदय शिथिल होते तेव्हा नोंदवलेल्या रक्तदाबाला _____ म्हणतात.

Ans
1. स्पंद
2. शीरीय (venous)
3. सिस्टोलिक
4. डायस्टोलिक ✔

Q.57 खालील गोष्टींचे मूल्यांकन करा.

$$\frac{5}{4}+\left(\frac{1}{1+\frac{3}{7}}\right)-\frac{4}{3}$$

Ans
1. $\frac{27}{68}$
2. $\frac{41}{70}$
3. $\frac{33}{64}$
4. $\frac{37}{60}$ ✔

Q.58 एका त्रिकोणाच्या बाजू 189 cm, 48 cm आणि 195 cm आहेत, तर त्याचे क्षेत्रफळ किती असेल? ($cm^2$ मध्ये)

Ans
1. 4532
2. 4509
3. 4536 ✔
4. 4501

Q.59 सरळरूप द्या.

$$\frac{4^3 \times 4^4 \times 2^4}{4^3 \times 8}$$

Ans
1. 2043
2. 2048 ✔
3. 2055
4. 2039

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

**Q.60** इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चारपैकी तीन अक्षर-समूह जोड्यांमध्ये एका विशिष्ट प्रकारे साधर्म्य आहे आणि म्हणून त्या एक गट तयार करतात. त्या गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी कोणती असेल?

(टीप: गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी ही त्याच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील तिच्या स्थानावर आधारित नसावी.)

**Ans**
- ✔ 1. NQ–NT
- ✘ 2. JM–KN
- ✘ 3. IL–JM
- ✘ 4. LO–MP

**Q.61** A, B, C, D, E आणि F यांची उंची वेगवेगळी आहे. E ही नेमकी 4 व्यक्तींपेक्षा उंच आहे आणि F ही नेमकी 4 व्यक्तींपेक्षा कमी उंचीची आहे. D ही A पेक्षा कमी उंचीची आहे, पण C पेक्षा जास्त उंचीची आहे. C ही सर्वात कमी उंचीची व्यक्ती नाही. तर किती व्यक्ती C पेक्षा कमी उंचीच्या असतील?

**Ans**
- ✔ 1. 2
- ✘ 2. 1
- ✘ 3. 3
- ✘ 4. 4

**Q.62** खालील मालिकेत केवळ एकच अक्षर-समूह चुकीचा आहे. चुकीचा अक्षर-समूह निवडा.

WOG ASK EWO IAS MEV QIA

**Ans**
- ✘ 1. EWO
- ✔ 2. MEV
- ✘ 3. IAS
- ✘ 4. QIA

**Q.63** 1857 च्या उठावाच्या संदर्भात, 1856 च्या जनरल सर्व्हिस एनलिस्टमेंट कायद्यानुसार शिपायांना काय आवश्यक होते?

**Ans**
- ✔ 1. काही सैनिकांच्या धार्मिक श्रद्धेचे उल्लंघन करणारी, सक्तीची परदेश सेवा
- ✘ 2. जातीच्या खुणा किंवा दाढी यांसारखी धार्मिक चिन्हे वापरण्यास मनाई
- ✘ 3. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय लग्न करण्यावर निर्बंध
- ✘ 4. सेवेत येण्यापूर्वी शिपायांचे ख्रिश्चन धर्मात धर्मांतर अनिवार्य

**Q.64** इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चार अक्षर-समुहांपैकी तीन एका विशिष्ट प्रकारे सारखे आहेत आणि त्यामुळे त्यांचा एक गट तयार होतो. त्या गटात न बसणारा अक्षर-समुह ओळखा.
(सूचना: गटात न बसणारा अक्षर-समुह हा त्याच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील त्याच्या स्थानावर आधारित नसावा.)

**Ans**
- ✘ 1. LCT
- ✔ 2. SAI
- ✘ 3. OFW
- ✘ 4. IZQ

**Q.65** :: च्या डाव्या बाजूला असलेल्या अक्षर-समूह जोडीतील प्रारुप आणि संबंध :: च्या उजव्या बाजूला असलेल्या अक्षर-समूह जोडीतील प्रारुप आणि संबंधासारखे होण्यासाठी खालीलपैकी कोणते अक्षर-समूह # आणि % च्या जागी येईल?

# : NVS :: JRO : %

**Ans**
- ✔ 1. # = MUR, % = KSP
- ✘ 2. # = MUR, % = KRP
- ✘ 3. # = MUS, % = KSP
- ✘ 4. # = MUR, % = KSO

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.66 एका विशिष्ट संकेतात 'lion tiger cat' हे 'dz ph st' असे संकेतबद्ध केले जाते, 'cat dog horse' हे 'lp jk st' असे संकेतबद्ध केले जाते आणि 'dog lion rat' हे 'ug ph jk' असे संकेतबद्ध केले जाते. तर त्याच संकेतात 'tiger' साठी कोणता संकेत असेल? (सर्व संकेत हे दोन-अक्षरी संकेत आहेत.)

Ans
- ✗ 1. st
- ✗ 2. jk
- ✓ 3. dz
- ✗ 4. ph

Q.67 एका टेबलावरील A बिंदूपासून B बिंदूपर्यंत 40 kg वजनाची वस्तू क्षितिज समांतर दिशेने हलवली जाते. या हालचालीदरम्यान गुरुत्वाकर्षण शक्तीने केलेले कार्य किती असेल?

Ans
- ✗ 1. 98 J
- ✗ 2. 10 J
- ✓ 3. 0 J
- ✗ 4. 400 J

Q.68 खालील समीकरणात, जर '+' आणि '–' यांची आणि '×' आणि '÷' यांची अदलाबदल केली, तर प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

60 + 15 ÷ 3 – 10 × 2 = ?

Ans
- ✓ 1. 20
- ✗ 2. 21
- ✗ 3. 19
- ✗ 4. 22

Q.69 एका विशिष्ट संकेतात 'dogs bark loud' हे 'xl mn vc' असे संकेतबद्ध केले जाते, 'cats and dogs' हे 'rs tp xl' असे संकेतबद्ध केले जाते आणि 'bark and play' हे 'mn rs wz' असे संकेतबद्ध केले जाते. त्याच संकेतात 'cats' साठी कोणता संकेत असेल? (सर्व संकेत हे दोन-अक्षरी संकेत आहेत.)

Ans
- ✓ 1. tp
- ✗ 2. rs
- ✗ 3. mn
- ✗ 4. xl

Q.70 भारताच्या जमिनीच्या सीमा सात देशांशी जोडलेल्या आहेत, तर खालीलपैकी कोणत्या देशाची जमिनीची सीमा भारताशी थेट जोडलेली नाही.

Ans
- ✗ 1. पाकिस्तान
- ✓ 2. ताजिकिस्तान
- ✗ 3. भूतान
- ✗ 4. म्यानमार

Q.71 लोकसंख्येतील अनुवांशिक विविधतेचा मुख्य फायदा म्हणजे _______ वाढते.

Ans
- ✗ 1. रोगाची विवशता
- ✗ 2. समानता
- ✓ 3. दीर्घायुमान
- ✗ 4. प्रजनन गती

Q.72 खालीलपैकी कोणते गुणोत्तर सर्वात मोठे आहे?

Ans
- ✓ 1. 38 : 51
- ✗ 2. 30 : 74
- ✗ 3. 43 : 76
- ✗ 4. 22 : 61

Blackbook

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now

Q.73 P, Q, R, S, T, U आणि V पैकी प्रत्येकाची सोमवारपासून सुरू होणारी आणि त्याच आठवड्याच्या रविवारी समाप्त होणारी आठवड्याच्या वेगळ्या दिवशी परीक्षा असते. U ची परीक्षा शनिवारी असते. T आणि S, ज्या दोघांचीही सोमवारी परीक्षा नसते, त्यांच्यामध्ये केवळ चार जणांची परीक्षा असते. V ची P नंतर लगेच परीक्षा असते आणि Q ची P च्या अगदी आधी परीक्षा असते. S ची V नंतर परीक्षा असते. T नंतर किती जणांची परीक्षा असते?

Ans
1. 2
2. 4
3. 5 ✔
4. 3

Q.74 शुद्ध तुपाची किंमत ₹86/kg आहे. ₹43/kg किंमतीच्या वनस्पती तेलाबरोबर भेसळ केल्यानंतर, एक अप्रामाणिक दुकानदार ते मिश्रण ₹80/kg दराने विकतो, ज्यामुळे त्याला 60% नफा होतो. तर ती दोन्ही मिश्रणे तो किती प्रमाणात मिसळतो?

Ans
1. 7 : 36 ✔
2. 11:34
3. 3 : 38
4. 6 : 41

Q.75 खालील मालिकेत केवळ एकच अक्षर-समूह चुकीचा आहे. चुकीचा अक्षर-समूह निवडा.

SAI XFN CUM HPX MUC RZH

Ans
1. RZH
2. MUC
3. CUM ✔
4. HPQ

Q.76 खालील समीकरणात, जर '+' आणि '−' यांची आणि '×' आणि '÷' यांची अदलाबदल केली, तर प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

50 − 8 + 2 ÷ 6 × 4 = ?

Ans
1. 54
2. 57
3. 56
4. 55 ✔

Q.77 एचआर गोखले यांच्या मते संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्याचे एक कारण काय होते?

Ans
1. हक्क आणि कर्तव्ये यांचे संतुलन साधून लोकशाही मजबूत करणे ✔
2. करांसाठी कायदेशीर चौकट तयार करणे
3. देशविरोधी कारवाया आणि विध्वंसक आंदोलनांना तोंड देणे
4. नागरिकांचे हक्क वाढवणे

Q.78 J, K, L, M, P आणि Q यातील प्रत्येकाने वेगवेगळे गुण मिळवले आहेत. केवळ दोन व्यक्तींनाच P आणि K यांच्या दरम्यानचे गुण मिळाले आहेत. केवळ एका व्यक्तीने M पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. केवळ तीन व्यक्तींनाच M आणि P यांच्या दरम्यानचे गुण मिळाले आहेत. Q ने L पेक्षा जास्त, पण J पेक्षा कमी गुण मिळवले आहेत. तर किती व्यक्तींनी L पेक्षा कमी गुण मिळवले असतील?

Ans
1. तीन
2. चार
3. दोन
4. एक ✔

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.79 खालील मालिकेत, केवळ एकच अक्षर-समूह चुकीचा आहे. चुकीचा अक्षर-समूह निवडा.

DVN ASP XPH UME RJB OGY

Ans
✔ 1. ASP
✘ 2. UME
✘ 3. RJB
✘ 4. XPH

Q.80 अनुवर्ती पोषण पातळीवर कीटकनाशकांच्या संकेंद्रणात होणाऱ्या प्रगतीशील वाढीस _______ असे म्हणतात.

Ans
✘ 1. बायोडिग्रेडेशन
✘ 2. बायोएक्युमुलेशन
✔ 3. बायोमॅग्निफिकेशन
✘ 4. बायोट्रान्सफॉर्मेशन

Q.81 हा प्रश्न खालील शब्दांवर आधारित आहे.

GOT HER WAR FIT

प्रत्येक शब्दात, प्रत्येक स्वर इंग्रजी वर्णमालाक्रमानुसार त्याच्या लगतच नंतरच्या अक्षरात बदलला जातो आणि प्रत्येक व्यंजन इंग्रजी वर्णमालाक्रमानुसार त्याच्या लगतच आधीच्या अक्षरात बदलले जाते. तर अशा प्रकारे तयार झालेल्या किती अक्षरांच्या समूहात स्वर दिसणार नाहीत?

Ans
✘ 1. एक
✘ 2. चार
✘ 3. दोन
✔ 4. तीन

Q.82 समवृत्त शंकूची त्रिज्या 8 cm आणि उंची 15 cm आहे. तर शंकूचे एकूण पृष्ठफळ किती असेल?

Ans
✘ 1. 136π cm2
✘ 2. 184π cm2
✔ 3. 200π cm2
✘ 4. 64π cm2

Q.83 अनुच्छेद 51A(b) कशावर जोर देतो?

Ans
✘ 1. भारताच्या सार्वभौमत्वाचे समर्थन करणे आणि संरक्षण करणे
✘ 2. राष्ट्रीय एकात्मता आणि एकतेला प्रोत्साहन देणे
✘ 3. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे
✔ 4. ज्यांमुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे

Q.84 दिलेल्या मालिकेतील प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय यायला हवे?

14, 25, 47, 80, 124 , ?

Ans
✘ 1. 180
✘ 2. 178
✘ 3. 177
✔ 4. 179

Q.85 एका वसतिगृहात 80 विद्यार्थी राहतात. नवीन प्रवेशांमुळे, 30 नवीन विद्यार्थी मेसमध्ये सामील होतात आणि मेसचा दैनंदिन खर्च ₹260 ने वाढतो, तर प्रतिव्यक्ती सरासरी खर्च ₹10 ने कमी होतो. मेसचा मूळ दैनिक खर्च (₹ मध्ये, जवळच्या दहाच्या पटीमध्ये पूर्णांकित) किती असेल?

Ans
✘ 1. 4,220
✔ 2. 3,630
✘ 3. 4,020
✘ 4. 3,720

Blackbook

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

**Q.86** सोडवा:

$$0.5 + 0.2 \times 4.8 \div (2.4 \div 1.2) - 0.90 \div 2$$

**Ans**
✗ 1. 0.52
✓ 2. 0.53
✗ 3. 0.51
✗ 4. 0.50

**Q.87** 8 kg वस्तुमानाची वस्तू जमिनीपासून 7 मीटर उंचीवर ठेवली जाते. तिच्यातील ऊर्जा किती असेल? ($g=10\ m/s^2$ गृहीत धरा)

**Ans**
✗ 1. 80 J
✗ 2. 56 J
✗ 3. 224 J
✓ 4. 560 J

**Q.88** A, B, C, D, E, F आणि G या प्रत्येकाची परीक्षा आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी सोमवारपासून सुरू होऊन त्याच आठवड्याच्या रविवारी संपते. A ची परीक्षा मंगळवारी असते. A आणि D च्या दरम्यान बरोबर तीन जणांची परीक्षा असते. F ची परीक्षा G च्या परीक्षेनंतर लगेचच असते. B आणि F च्या दरम्यान फक्त एकाच व्यक्तीची परीक्षा असते. C ची परीक्षा B आणि E या दोघांच्या आधी असते. E ची शनिवारी किंवा रविवारी परीक्षा नसते. C नंतर किती जणांची परीक्षा असते?

**Ans**
✗ 1. 5
✗ 2. 3
✗ 3. 4
✓ 4. 6

**Q.89** एका विद्यार्थ्याने कॅल्शियम कार्बोनेटमध्ये विरल HCl मिसळले. खालीलपैकी कोणते प्रायोगिक निरीक्षण वायू उत्सर्जित झाला आहे याची पुष्टी करते?

**Ans**
✗ 1. द्रावण गुलाबी होते
✗ 2. पांढरा अवक्षेप तयार होणे
✓ 3. बुडबुडे दिसून येतात
✗ 4. जाणवलेला उग्र वास

**Q.90** दिलेली विधाने आणि निष्कर्ष काळजीपूर्वक वाचा. विधानांमध्ये दिलेली माहिती ही सामान्यतः ज्ञात तथ्यांपेक्षा भिन्न वाटत असली तरी, ती सत्य आहे असे गृहीत धरून दिलेल्या निष्कर्षांपैकी कोणता/ते निष्कर्ष दिलेल्या विधानांशी तर्कसंगत आहे/आहेत ते ठरवा.

**विधाने:**
कोणताही खिळा कटर नाही.
सर्व कटर चाकू आहेत.
कोणताही कटर कात्री नाही.

**निष्कर्ष:**
(I) कोणतीही कात्री चाकू नाही.
(II) काही खिळे चाकू आहेत.

**Ans**
✗ 1. केवळ निष्कर्ष (II) तर्कसंगत आहे.
✗ 2. केवळ निष्कर्ष (I) तर्कसंगत आहे.
✗ 3. निष्कर्ष (I) आणि निष्कर्ष (II) हे दोन्ही तर्कसंगत आहेत.
✓ 4. निष्कर्ष (I) किंवा निष्कर्ष (II) यापैकी एकही तर्कसंगत नाही.

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.91

खालील पदावलीचे मूल्य काढा.

$$\frac{3}{2} + \left(\frac{1}{1 + \frac{3}{7}}\right) - \frac{3}{5}$$

Ans

1. $\frac{18}{11}$

2. $\frac{3}{2}$

3. $\frac{6}{5}$

4. $\frac{8}{5}$

Q.92 जुलै 2025 मध्ये भारतीय सैन्याने खालीलपैकी कोणत्या राज्यात 'दिव्य दृष्टी' नावाचा अति उच्च तंत्रज्ञान प्रात्यक्षिक सराव आयोजित केला होता?

Ans

1. अरुणाचल प्रदेश

2. केरळ

3. सिक्कीम

4. उत्तराखंड

Q.93 $4^2 + \sqrt{6^2} - 5\sqrt{9} - 11$ चे मूल्य _______ आहे.

Ans

1. $-9$

2. $-2$

3. $3$

4. $-4$

Q.94 एका बहिर्गोल भिंगाचे नाभीय अंतर 20 cm आहे. एक वस्तू भिंगासमोर अशा प्रकारे ठेवली जाते की ती वस्तूच्याच बाजूला भिंगापासून 10 cm अंतरावर एक आभासी प्रतिमा तयार करते. भिंगाने केलेले विशालन किती आहे?

Ans

1. विशालन = 0.33

2. विशालन = 0.66

3. विशालन = 0.75

4. विशालन = 0.5

Q.95 नीति आयोगाच्या वार्षिक अहवाल 2014-2015 मध्ये प्रकाशित झालेल्या 2011-2012 च्या डेटानुसार, खालीलपैकी कोणत्या राज्यात दारिद्र्यरेषेखालील लोकांची टक्केवारी सर्वाधिक आहे?

Ans

1. अरुणाचल प्रदेश

2. झारखंड

3. बिहार

4. छत्तीसगढ

Q.96 कण्व राजवंशाची स्थापना खालीलपैकी कोणी केली?

Ans

1. मिनँडर

2. पुष्यमित्र

3. रुद्रदामन

4. वासुदेव

Blackbook

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.97 या प्रश्नामध्ये प्रश्नानंतर I आणि II क्रमांकाची दोन विधाने दिलेली आहेत. विधानांमध्ये दिलेली माहिती ही प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे का, हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि सर्वात योग्य उत्तर निवडा.

प्रश्न:
B, C, D, E, F आणि G हे सहा मित्र एका सरळ रेषेत उत्तरेकडे तोंड करून बसले आहेत. त्यापैकी कोण अगदी उजव्या टोकाला बसले असेल?

विधाने:
(I) B आणि E च्या मध्ये नेमक्या चार व्यक्ती बसल्या आहेत. G ही E च्या लगतच उजवीकडे बसली आहे.
(II) F ही C ची लगतची शेजारी आहे. B आणि C च्या मध्ये नेमक्या दोन व्यक्ती बसल्या आहेत.

Ans
✔ 1. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी केवळ विधान I मधील माहिती पुरेशी आहे, तर विधान II मधील माहिती पुरेशी नाही
✘ 2. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे पुरेशी आहे.
✘ 3. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी केवळ विधान II मधील माहिती पुरेशी आहे, तर विधान I मधील माहिती पुरेशी नाही
✘ 4. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधान I आणि II मधील माहिती एकत्रितपणे पुरेशी नाही.

Q.98 जर ‘A’ म्हणजे ‘+’, ‘B’ म्हणजे ‘−’, ‘C’ म्हणजे ‘×’ आणि ‘D’ म्हणजे ‘÷’ असेल, तर पुढील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

8 C 7 B 24 D 8 A 5 = ?

Ans
✘ 1. 59
✘ 2. 56
✔ 3. 58
✘ 4. 57

Q.99 पक्षी आणि सस्तन प्राण्यांसारख्या उच्च ऊर्जेची गरज असलेल्या सजीवांच्या ________ असतात.

Ans
✘ 1. हृदयाला तीन कप्पे
✘ 2. हृदयाला दोन कप्पे
✔ 3. हृदयाला चार कप्पे
✘ 4. हृदयाला एक कप्पा

Q.100 बस डेपोमधून दर 8 मिनिटांनी बस सुटतात आणि सरळ रस्त्यावरून 24 km/hr वेगाने प्रवास करतात. त्याच रस्त्याने डेपोकडे जाणाऱ्या एका प्रवाश्याला 6 मिनिटांच्या नियमित अंतराळाने बस भेटतात. प्रवाशाचा वेग शोधा.

Ans
✘ 1. 5 km/hr
✔ 2. 8 km/hr
✘ 3. 3 km/hr
✘ 4. 6 km/hr

Q.101 दोन समांतर रांगेमध्ये प्रत्येकी 4 व्यक्ती अशा प्रकारे आठ व्यक्ती बसलेल्या आहेत की लगतच्या व्यक्तींमध्ये समान अंतर असेल.
1 रांगेत - A, D, G आणि F बसलेल्या आहेत आणि त्या सर्वांचे तोंड दक्षिणेकडे आहे.
2 रांगेत – P, R, N आणि Z बसलेल्या आहेत आणि त्या सर्वांचे तोंड उत्तरेकडे आहे.
अशा प्रकारे, प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या रांगेतील वेगळ्या व्यक्तीच्या समोर बसते.
Z ही R च्या डावीकडे तिसऱ्या स्थानावर बसली आहे. F च्या समोर बसलेली व्यक्ती ही R ची लगतची शेजारी आहे. A ही F च्या उजवीकडील स्थानांपैकी एका स्थानावर आणि P च्या समोर बसत नाही. D ही G च्या उजवीकडे तिसऱ्या स्थानावर बसली आहे. खालीलपैकी कोण N च्या समोर बसले आहे?

Ans
✘ 1. P
✘ 2. Z
✔ 3. A
✘ 4. G

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.102 जागतिक तापमानवाढीच्या समस्या सोडवण्यासाठी 1988 मध्ये स्थापन झालेल्या इंटरगव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमॅट चेंज (IPCC) ची स्थापना कोणत्या दोन संघटनांनी केली होती?

Ans
- ✗ 1. UN डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) आणि UN फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमॅट चेंज (UNFCCC)
- ✗ 2. इंटरनॅशनल एनर्जि एजन्सि (IEA) आणि वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन (WTO)
- ✓ 3. वर्ल्ड मेटीओरोलॉजिकल ऑर्गनायझेशन (WMO) आणि युनायटेड नेशन्स एनवायर्नमेंट प्रोग्राम (UNEP)
- ✗ 4. वर्ल्ड बँक आणि इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (IMF)

Q.103 स्लाईड शोमध्ये, कोणता पर्याय सुनिश्चित करतो की नवीन फाइल तयार न करता एका MS पॉवरपॉईंट 2019 प्रेझेंटेशन दरम्यान फक्त विशिष्ट स्लाईडचा संच प्ले केला जाईल?

Ans
- ✓ 1. यूज कस्टम स्लाइड शो
- ✗ 2. शो स्लाइड्स : फ्रॉम – टु रेंज
- ✗ 3. ब्राऊज्ड ॲट ए किओस्क
- ✗ 4. लूप कंटिंनुयसली अंटिल Esc

Q.104 हरित क्रांतीच्या पहिल्या टप्प्यात स्थापन झालेली कोणती सांविधिक संस्था भारतातील अन्नधान्य आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनाशी संबंधित आहे?

Ans
- ✗ 1. कृषी आणि प्रक्रियायुक्त खाद्य उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण
- ✗ 2. अन्न व कृषी संघटना
- ✓ 3. भारतीय अन्न महामंडळ
- ✗ 4. फूड स्टॅक पोर्टल

Q.105 खालील अक्षरे, संख्या, चिन्ह मालिकेचा संदर्भ घ्या आणि प्रश्नाचे उत्तर द्या. मोजणी डावीकडून उजवीकडे करायची आहे.

(डावी बाजू) $ T 1 & 9 Z 7 * A 0 # K @ N Z (उजवी बाजू)

येथे अशा किती संख्या आहेत ज्यांच्या लगतच आधी एक चिन्ह येते आणि त्यानंतर लगतच एक अक्षर देखील येते?

Ans
- ✓ 1. एक
- ✗ 2. दोन
- ✗ 3. कोणतेही नाही
- ✗ 4. चार

Q.106 LMNO हा ∠M = 102° असलेला एक चक्रीय चतुर्भुज आहे. L आणि N वरील स्पर्शिका P बिंदूवर भेटतात. तर ∠LPN चे माप काय असेल?

Ans
- ✓ 1. 24°
- ✗ 2. 20°
- ✗ 3. 22°
- ✗ 4. 26°

Q.107 खालीलपैकी कोणते न्यायालय भारतातील लहान आर्थिक हितसंबंधांची (pecuniary stake) दिवाणी प्रकरणे हाताळते?

Ans
- ✗ 1. दुय्यम न्यायाधीश न्यायालय (Court of Subordinate Judge)
- ✗ 2. सत्र न्यायालय (Sessions Court)
- ✗ 3. मुख्य न्याय दंडाधिकारी (Chief Judicial Magistrate)
- ✓ 4. मुन्सिफ न्यायालय (Court of Munsiff)

Q.108 रामानंद त्यांच्या उत्पन्नातील 48% अन्नावर, 25% घरभाड्यावर, 12% वाहतूक आणि उर्वरित 60% मुलांच्या शिक्षणावर खर्च करतात. त्याच्याकडे शिल्लक राहिलेल्या उत्पन्नाची टक्केवारी शोधा.

Ans
- ✗ 1. 9%
- ✗ 2. 9.98%
- ✗ 3. 8.25%
- ✓ 4. 6%

Blackbook

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.109 इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चारपैकी तीन अक्षर-समूह जोड्यांमध्ये एका विशिष्ट प्रकारे साधर्म्य आहे आणि म्हणून त्या एक गट तयार करतात. त्या गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी कोणती असेल?

(टीप: गटात न बसणारी अक्षर-समूह जोडी ही त्याच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षर-समूहातील तिच्या स्थानावर आधारित नसावी.)

Ans
1. VZ–WA
2. DH–DK
3. NR–OS
4. QU–RV

Q.110 जर तुमच्याकडे तीन व्हेरिएबल्स —X, Y आणि Z—असतील आणि तुम्हाला चार्टवर X विरुद्ध Y दाखवायचे असेल आणि मार्कर साइजद्वारे Z दर्शवायचे असेल, तर MS एक्सेल मध्ये चार्टचा कोणता प्रकार सर्वात योग्य आहे?

Ans
1. स्कॅटर चार्ट
2. लाइन चार्ट
3. बबल चार्ट
4. एरिया चार्ट

Q.111 खालील संख्या-जोड्यांमध्ये, पहिल्या संख्येवर काही गणितीय क्रिया करून दुसरी संख्या मिळवली जाते. खालील संख्या-जोड्यांतील संख्यांप्रमाणेच ज्या संख्या-जोड्यांच्या संख्यांमध्ये संबंध आहे ती जोडी पर्यायातून निवडा. (सूचना: संख्यांना त्यांच्या घटक अंकांमध्ये विभाजित न करता संपूर्ण संख्यांवर गणितीय क्रिया कराव्यात. उदा. 13 - 13 वर बेरीज/वजाबाकी/गुणाकार अशा गणितीय क्रिया करता येतील. 13 ला 1 आणि 3 मध्ये विभाजित करून नंतर 1 आणि 3 वर गणितीय क्रिया करणे अभिप्रेत नाही.)

8, 38
11, 53

Ans
1. 15, 68
2. 15, 67
3. 14, 68
4. 14, 67

Q.112 एका मूल्यात आधी 10% वाढ केली जाते आणि नंतर 20% वाढ केली जाते. निव्वळ टक्केवारी वाढ किती आहे?

Ans
1. 32
2. 30
3. 31
4. 33

Q.113 एका प्रश्नानंतर (I) आणि (II) अशा क्रमांकाची दोन विधाने दिली आहेत. विधानांमध्ये दिलेली माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे की नाही हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि सर्वात योग्य उत्तर निवडा.

P, Q, R, S आणि T या सर्व पाच व्यक्ती उत्तरेकडे तोंड करून एका रांगेत बसलेल्या आहेत, तर डाव्या टोकापासून दुसऱ्या स्थानावर कोण बसले असेल?

विधाने:
I. P ही T च्या लगत उजव्या बाजूला बसली आहे. P ही S च्या लगत डाव्या बाजूला बसली आहे.
II. P आणि Q च्या मध्ये केवळ T व्यक्ती बसली आहे.

Ans
1. I आणि II ही दोन्ही विधाने एकत्रितपणे (आणि केवळ विधान I किंवा केवळ विधान II नसून) प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहेत
2. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधान II मधील माहिती पुरेशी आहे, तर विधान I मधील माहिती पुरेशी नाही
3. I आणि II ही दोन्ही विधाने एकत्रितपणे प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी नाहीत
4. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी विधान I मधील माहिती पुरेशी आहे, तर विधान II मधील माहिती पुरेशी नाही

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

Q.114 P आणि Q चे वय 5 : 9 या गुणोत्तरात आहे. जर P चे वय 25 वर्षे असेल, तर Q हा P पेक्षा किती वर्षांनी मोठा आहे?

Ans
- ✗ 1. 25 वर्षे
- ✗ 2. 15 वर्षे
- ✓ 3. 20 वर्षे
- ✗ 4. 10 वर्षे

Q.115 पश्चिम आर्क्टिकचा प्रवेशद्वार असलेले इनुविक बंदर कोणत्या देशात आहे?

Ans
- ✗ 1. स्वीडन
- ✓ 2. कॅनडा
- ✗ 3. ग्रीनलँड
- ✗ 4. रशिया

Q.116 अजित A स्थानापासून गाडी चालवण्यास सुरुवात करतो आणि पूर्वेकडे 8 km जातो. त्यानंतर तो उजवीकडे वळतो आणि 17 km गाडी चालवतो. तो शेवटी डावीकडे वळण घेत 10 km गाडी चालवतो आणि B स्थानावर थांबतो. विशाल P स्थानापासून गाडी चालवण्यास सुरुवात करतो, जे A स्थानापासून 13 km पूर्वेकडे आहे आणि तो पूर्वेकडे 6 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवीकडे वळतो आणि 17 km गाडी चालवतो. तो शेवटी डावीकडे वळण घेतो आणि 1 km गाडी चालवतो आणि Q स्थानावर थांबतो.तर Q स्थान आणि B स्थान यांच्यामधील सर्वात कमी अंतर किती आहे? (सर्व वळणे केवळ 90-अंशाची आहेत.)

Ans
- ✗ 1. 3 km
- ✗ 2. 4 km
- ✓ 3. 2 km
- ✗ 4. 1 km

Q.117 एका विशिष्ट रकमेवरील वार्षिक 8% दराने 3 वर्षांसाठी मिळणारे सरळ व्याज हे त्याच रकमेवरील वार्षिक 6% दराने 3 वर्षांसाठी मिळणाऱ्या सरळ व्याजापेक्षा ₹360 ने जास्त आहे. तर मुद्दल शोधा.

Ans
- ✓ 1. ₹6,000
- ✗ 2. ₹3,600
- ✗ 3. ₹7,200
- ✗ 4. ₹4,800

Q.118 खालीलपैकी कोणते राज्य धोरणांचे निदेशक तत्व गांधीवादी तत्वांवर आधारित आहे?

Ans
- ✓ 1. ग्रामपंचायतींचे संघटन करणे
- ✗ 2. उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क सुरक्षित करणे
- ✗ 3. पुरुष व स्त्रिया ह्यांना सामान वेतन मिळवून देणे
- ✗ 4. आंतरराष्ट्रीय शांततेला प्रोत्साहन देणे

Q.119 जयपूरमधील हवा महल कोणत्या सम्राटाच्या राजवटीत बांधण्यात आला होता?

Ans
- ✗ 1. अशोक
- ✗ 2. चंद्रगुप्त मौर्य
- ✗ 3. राणा प्रताप सिंह
- ✓ 4. सवाई प्रताप सिंह

Q.120 एक व्यक्ती 3 km/ hr वेगाने ठराविक अंतर 13 तासांत आणि आणखी काही अंतर 6 km/ hr वेगाने 15 तासांत कापते. तर तिचा अंतर कापण्यासाठी सरासरी वेग शोधा.

Ans
- ✓ 1. $4\frac{17}{28}$ km/hr
- ✗ 2. $5\frac{17}{28}$ km/hr
- ✗ 3. $11\frac{17}{28}$ km/hr
- ✗ 4. $8\frac{17}{28}$ km/hr

Get the Toppers Choice
BLACKBOOK VOCAB APP - Download Now
GET IT ON Google Play

"

Blackbook

Generated by rank.qmaths.in